# जेल पर्यटन

भारताच्या इतिहासामध्ये महाराष्ट्रातील कारागृहांना अनन्य स्थान आहे, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महान नेत्यांना ब्रिटीशांनी येरवडा कारागृहात तसेच इतर कारागृहांतही जसे की ठाणे, नाशिक, धुळे व रत्नागिरी येथे कैद करुन ठेवले होते.

(१) महात्मा गांधी, दिनांक २२.०३.१९२२ ते ०५.०२.१९२४, दिनांक ०४.०१.१९३२ ते ०८.०५.१९३३,
दिनाक ०२.०८.१९३३ ते ०४.०८.१९३३.

(२) लोकमान्य टिळक, दिनांक २९.०१.१८९८ ते २८.०२.१८९९.

(३) मोतीलाल नेहरु, दिनांक १२.०८.१९३० ते ३१.१२.१९३०.

(४) पंडीत जवाहरलाल नेहरु, दिनांक १२.०८.१९३० ते १३.१०.१९३०

(५) सरदार वल्लभभाई पटेल, दिनांक १०.०८.१९३० ते ०६.११.१९३०, दिनांक ०४.०१.१९३२ ते ०१.०८.१९३३,
दिनांक १८.०४.१९४५ ते १५.०६.१९४५

(६) सरोजिनी नायडू, दिनांक ०१.१२.१९४० ते ११.१२.१९४०

(७) सुभाषचंद्र बोस दिनांक १३.०४.१९३६ ते १६.०५.१९३६ या सर्व थोर नेत्यांना ब्रिटीशांनी येरवडा कारागृहात कैद करुन ठेवले होते. या थोर नेत्यांच्या कारावासाची ठिकाणे स्मारक म्हणून जतन करण्यात आलेली आहेत व ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी या थोर नेत्यांनी केलेल्या त्यागाचे स्मरण देत राहतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यामध्ये प्रसिध्द असा पुणे करार दिनांक २४.०९.१९३२ रोजी झाला तो याच येरवडा कारागृहात गांधी यार्ड असलेल्या आंब्याच्या झाडाखाली झाला त्या झाडाची सुध्दा योग्य प्रकारे देखभाल करण्यात येत आहे. इ.स. १८९९ मध्ये चापेकर बंधूना येरवडा कारागृहातच फाशी देण्यात आली. तसेच जनरल वैद्य यांच्या हत्येप्रकरणी कुप्रसिध्द जिंदा व सुखा यांना सुध्दा येरवडा कारागृहातील वधस्तंभावर फाशी देण्यात आली आहे. दिनाक २६.११.२००८ रोजीच्या मुंबई हल्ल्यातील कुप्रसिध्द अतिरेकी अजमल कसाबला सुध्दा याच कारागृहात फाशी देण्यात आली.

शाळा/कॉलेज/विद्यापीठ व शैक्षणिक आस्थापना तसेच नोंदणीकृत अशासकीय संस्थाना ही ऐतिहासिक ठिकाणे पाहता यावीत या दृष्टीकोनातून गृह विभाग याद्वारे प्रथमतःच **'जेल पर्यटन'** सुरु करीत आहे. यामुळे विद्यार्थी आणि शैक्षणिक आस्थापना, अशासकीय संस्थाच्या प्रतिनिधींना भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आणि येरवडा कारागृहात घडलेल्या इतर ऐतिहासिक घटना पाहता व अनुभवता येतील. या ठिकाणी उल्लेख करणे प्रसंगोचित आहे की, कारागृहे ही समाजातील लोकांच्या प्रवेशासाठी मनाई असलेला भाग आहे.

हा पर्यटन उपक्रम राबविताना सुरक्षेचे उल्लंघन होणार नाही, तसेच अनिष्ट घटकांना प्रवेश मिळणार नाही याची कारागृह प्रशासन योग्य ती काळजी घेईल.तसेच कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पुरेशी दक्षता घेतली जाईल. पर्यटकांना माहिती देण्यासाठी पर्यटन गाईड पुरविला जाईल. दररोज भेट देण्याऱ्या पर्यटकांची संख्या ५० पेक्षा जास्त असणार नाही.

येरवडा कारागृहास पर्यटक म्हणुन भेट देणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या संस्थेच्या लेटरहेडवर अर्ज करताना पर्यटक म्हणुन भेट देणाऱ्या व्यक्तींची नांवे व मुलभुत तपशील याचा उल्लेख करणे आवश्यक राहिल. सदरील अर्ज अधीक्षक येरवडा कारागृह यांच्या yerwadacp-mh@gov.in किंवा spycppune@gmail.com या मेलवर अथवा प्रत्यक्षपणे कारागृह येथे किमान सात दिवस अगोदर करावा. येरवडा कारागृहाचा संपर्क क्र.०२०-२६६८२६६३/०२०-२९७०२५८६ आहे. संपर्का संदर्भात काही मुद्दा असल्यास भेट देवु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी **अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह यांच्या वैयक्तीक संपर्क क्रमांक ०२०-२६६८७७४१** यावर संपर्क साधावा.

पर्यटक म्हणुन भेट देणाऱ्या व्यक्तींनी पुढील नमुद केलेले जसे की,आधार कार्ड, संस्थेचे ओळखपत्र किंवा पासपोर्ट यापैकी कोणताही दस्तऐवज सादर करुन ओळख सिद्ध करणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ, बॅगेज, मोबाईल फोन, कॅमेरा, पाण्याची बाटली किंवा कोणतीही वस्तु कारागृहाच्या आतमध्ये नेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. कारागृह प्रशासनाने फोटोग्राफी तसेच व्हीडीओग्राफीची व्यवस्था केलेली असुन ते कारागृहातुन बाहेर पडल्यानंतर पुरविण्यात येईल. तथापि, कारागृह विभागाला अनिष्ट व्यक्तीस प्रवेश नाकारण्याचा अधिकार असेल.